# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.05.2025** **वार:शनिवार**

1. जागतिक दृकश्राव्य शिखर परिषदेच्या निमित्तानं राज्य सरकारद्वारे महत्त्वाचे सामंजस्य करार
2. चित्रीकरणासाठी महाराष्ट्रात दोन अत्याधुनिक स्टुडिओ उभारण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
3. 21 जून रोजी देशभरात एक लाख ठिकाणी अकरावा योग दिवस साजरा करण्याचं नियोजन
4. महाबळेश्वर महापर्यटन उत्सवाचं थाटात उद्घाटन आणि
5. अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<u>वेव्हज</u>**

वेव्हज अर्थात जागतिक दृकश्राव्य शिखर परिषदेच्या निमित्तानं राज्य सरकारनं काल काही महत्त्वाचे सामंजस्य करार केले. ऑस्ट्रेलिया आणि न्यूयॉर्क या दोन जागतिक विद्यापीठांसोबत काल सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत, परदेशी विद्यापीठांना देशात त्यांचं केंद्र उघडण्याची परवानगी मिळाली असून, नवी मुंबईत सिडकोच्या पुढाकारानं एज्युसिटी उभारण्यात येणार आहे. देशातलं जागतिक विद्यापीठ एकत्र असलेला पहिला परिसर, नवी मुंबईत सुरू होत आहे.

वेव्हज् परिषदेसारख्या एका व्यासपीठाची जागतिक पातळीवर गरज होती. ही गरज ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्या वेव्हज् परिषदेचं आयोजन केलं आणि त्याचं यजमानपद महाराष्ट्राकडे दिल, राज्यासाठी ही एक मोठी संधी आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. याबद्दल बोलताना ते म्हणाले....

**कलापासून मी या क्षेत्रातल्या ज्या ज्या लोकांशी इंटरअक्शन करतोय, त्या सगळ्याचं म्हणण आहे कि अशा प्रकारच्या एका व्यासपीठाची आवश्यकता होती. कारण आज जर कोणतीही वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असेल तर एव्हीजीसीची अर्थव्यवस्था सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. सर्वात जास्त रोजगाराची संधी या इकोसिस्टममध्ये तयार होत आहे. आणि याच्या मध्ये पहिल्यांदा भारताला लीड करण्याची संधी आहे. कारण कंटेंट क्रिएटर्स असतील जे सर्वात जास्त आपल्याकडे आहेत, कंटेंट कंझम्पशन असेल ते आपल्याकडे सगळ्यात जास्त आहे आणि म्हणूनच त्यात नेतृत्व करणे खूप महत्वाचे आहे.**

चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी महाराष्ट्रात दोन अत्याधुनिक स्टुडिओ उभारण्यात येणार असल्याची घोषणा फडणवीस यांनी यावेळी केली. वेव्हज् परिषदेत भारत पेव्हेलियनला त्यांनी यावेळी भेट दिली, आणि वार्ताहरांशी संवाद साधला. या दोन स्टुडिओच्या उभारणीसाठी प्राईम फोकस आणि गोदरेजसोबत सामंजस्य करार केले आहेत. गोदरेजच्या सहाय्याने पनवेल मधे दोन हजार एकर जागेवर चित्रनगरी उभारली जाणार असून, यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असल्याचंही ते म्हणाले. चित्रनगरी उभारण्यासाठी आता जागेची नाही तर तंत्रज्ञानाची गरज आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राष्ट्रीय शेअर बाजाराच्या Nifty Waves Index चं उद्घाटन केलं. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातल्या 43 कंपन्याच्या समभागांचा समावेश या निर्देशांकात आहे.

वेव्हज मध्ये काल जागतिक माध्यम संवाद कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. तंत्रज्ञान आणि परंपरा हातात हात घालून जायला हव्यात, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी या सत्राचं उद्घाटन करताना सांगितलं. तंत्रज्ञानामुळे

तरुण पिढीचा अनुभव समृद्ध होतो, विकसित भारताच्या निर्मितीसाठी नवोन्मेष आवश्यक आहे, असं त्यांनी सांगितलं. संस्कृती सर्जनशीलतेला प्रेरित करते, त्यामुळं संस्कृतीच्या वैविध्याला आपण पाठिंबा द्यायला हवा, असं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यावेळी उपस्थित होते.

भारत-अमेरिका सर्जनशीलता परिसंस्थेला चालना देण्यासाठी वेव्हज् परिषदेत एक सत्र आयोजित करण्यात आलं होतं. अमेरिकेचे काऊनसेलर माईक हँकी यांनी या सत्राचं उद्घाटन केलं आणि उपस्थितांना संबोधित केलं. भारताने आपलं तत्त्वज्ञान, व्यावहारिक ज्ञान आणि शिकवणीच्या आधारे जगाच्या ज्ञानात भर टाकली, असं उद्योजक नीता अंबानी यांनी यावेळी एका चर्चासत्रात सांगितल.

**<u>आयुषमंत्री-नाशिक</u>**

आगामी 21 जून या योगदिनाच्या पार्श्वभूमीवर, नाशिकमध्ये पंचवटीत रामकुंड परिसरातल्या गौरी मैदान इथं काल सामूहिक योग प्रात्यक्षिकांनी योग महोत्सवाची सुरुवात झाली. केंद्रीय आयुष आणि आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत शेकडो नागरिकांनी यावेळी योग साधना केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झालेला हा 11 वा योग दिवस देशात एक लाख ठिकाणी साजरा होईल, यादृष्टीनं नियोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी योगसंगम ॲप तयार करण्यात आलं असून, त्यात नोंदणी करून योगसाधना करता येईल, अशी माहिती जाधव यांनी यावेळी दिली.

**<u>घाशीराम कोतवाल</u>**

विजय तेंडुलकर लिखित 'घाशीराम कोतवाल' हे नाटक हिंदीमध्ये व्यावसायिक रंगभूमीवर येत असल्याची घोषणा प्रसिद्ध चित्रपट निर्माते, लेखक, दिग्दर्शक अभिजित पानसे यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत केली. येत्या जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या नाटकाचा शुभारंभ होऊन भारतातल्या महत्त्वाच्या नाट्यमहोत्सवात आणि विविध राज्यांमधे या नाटकाचे प्रयोग सादर केले जातील असं ते म्हणाले. 'घासीराम कोतवाल' असं या नाटकाचं हिंदी नाव असून 50 कलाकारांच्या संचात ते सादर होणार आहे. याविषयी आकाशवाणी प्रतिनिधी नितीन जळूकर यांना अधिक माहिती देताना ते म्हणाले....

**घाशीराम कोतवाल हिंदीमध्ये सादर करण्याच मोठा आहवान आहे आणि हे शिवधनुष्य पेलण्यासारख आहे. पण तरीही जो आमचा संच आहे आणि आमचे सहकारी आहेत त्यायोगे एक मराठीतली अतिशय गाजलेली, अत्यंत नितांत सुंदर अशी ही कलाकृती आम्ही पूर्ण देशभर किंवा जगभराच्या हिंदीभाषिकांच्या समोर इतर भाषिक लोकांसमोर आणण्याचा भव्य प्रयत्न करत आहोत. आणि मुख्यत्वे करून तेंडूलकरांनी जेव्हा हे घाशीराम कोतवाल लिहील आता तेंडूलकरांविषयी मी काही बोलण्याची योग्यता माझी नाही जबार पटेलांनी ज्या प्रकारे बसवल त्याची काही मी बोलण्याची माझी योग्यता नाही. पण एक नवीन प्रकारे, नवीन लोकांसमोर, नवीन पिढी समोर हे नाटक दिमाखाने यावं आणि आज आम्ही जेव्हा या निर्मितीत उतरायच ठरवल तेव्हा घाशीराम सारखं नाटक हातात आला नंतर सोडून देण शक्यचं नव्हत.**

**<u>रेल्वे</u>**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते आज हडपसर जोधपुर एक्सप्रेस आणि एम जी आर चेन्नई सेंट्रल-भगत की कोठी एक्सप्रेसचं उद्घाटन करण्यात येणार आहे. हडपसर- जोधपुर एक्सप्रेस, हडपसरमधून संध्याकाळी साडे पाच वाजता सुटेल आणि जोधपुरला दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजता पोहोचेल. जोधपुरहून रविवारी रात्री साडे आठ वाजता निघून हडपसर ला दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पाच वाजता पोहोचेल. चिंचवड, लोणावळा, कल्याण, सुरत, अहमदाबाद, पालनपुर, लूनी मार्गे ही गाडी धावणार आहे.

**<u>आयुष</u>**

पुण्यातील लोणावळा इथल्या कैवल्यधाम योग संस्थेत आयोजित दोन दिवसांच्या राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचा काल समारोप झाला. देशातील आयुष-आधारित आरोग्य सेवांचं भविष्य घडवण्यासाठी ही परिषद, एक राष्ट्रीय व्यासपीठ म्हणून काम

करेल. या परिषदेदरम्यान विविध राज्यांसमोरील आव्हानं आणि संभाव्य उपाय, यावर चर्चा झाली. असं आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा यांनी सांगितलं.

**<u>पर्यटन</u>**

महाबळेश्वर इथं आयोजित पर्यटन उत्सवामुळं पर्यटन वाढीला निश्चितपणे चालना मिळेल आणि महाबळेश्वरचं नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर जाईल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल व्यक्त केला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि पर्यटन विभागाद्वारे उद्यापर्यंत महापर्यटन उत्सव महाबळेश्वरचं आयोजन करण्यात आलं आहे, त्याचं उद्घाटन करताना शिंदे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी खाद्य उत्सव, मुलांचा परिसर, वेण्णा लेकमधील तरंगता बाजार, प्रतापसिंह उद्यान आदी ठिकाणी भेटी दिल्या. गोल्फ क्लब इथं उभारण्यात आलेल्या टेंट सिटीचंही त्यांनी उद्घाटन केलं.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल अहमदाबाद इथं गुजरात टायटन्सनं सनरायझर्स हैदराबादचा 38 धावांनी पराभव केला. गुजरातनं हैद्राबादसमोर विजयासाठी 225 धावांचं आव्हान ठेवलं होतं.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. काल सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 44 पूर्णांक 5 तर सोलापूर इथं 44 पूर्णांक 1 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. पुढील काही दिवस तापमान असंच राहणार असून नागरिकांना खबरदारी घेण्याचं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार